# डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

(दि.१५ ऑक्टोबर, १९३१ - २७ जुलै, २०१५)

(अल्प परिचय)

एक थोर भारतीय शास्त्रज्ञ, क्षेपणास्त्रांचे प्रणेते, भारतरत्न आणि भारताचे माजी राष्ट्रपती. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म रामेश्वरम (तमिळनाडू) येथे अगदी सामान्य कुटुंबात झाला.

मॅट्रिकनंतर ते त्रिचुरापल्लीच्या सेन्ट जोसेफ महाविद्यालयातून बी. एस्सी. (१९५६) झाले. पुढे मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून अवकाश विज्ञान अभियांत्रिकीत त्यांनी पदवी घेतली (१९५८) आणि डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेन्ट ऑर्गनायझेशन (डी. आर. डी. ओ.) येथे नोकरी स्विकारली.

“इस्त्रो” मध्ये (केरळ) १९ वर्षे सेवा करून पुन्हा डी. आर. डी. ओ. मध्ये पुनरागमन केले. त्यांची गाईडेड मिसाईल डेव्हलपमेन्ट प्रोग्रॅमचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. यातूनच “पृथ्वी” आणि “अग्नी” ही दोन क्षेपणास्त्रे यशस्वी प्रक्षेपित केले. याचे सर्व श्रेय कलाम यांनाच आहे.

डॉ. कलाम हे भारतीय संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार (१९९७-९८), केंद्र शासनातील तांत्रिक माहिती, पूर्वानुमान आणि मूल्यमापन मंडळाचे अध्यक्ष (१९९९-२०००) होते. त्यानंतर डॉ. कलाम यांनी राष्ट्रपती पदाची निवडणूक लढविली आणि ते निवडून आले (२००२). राष्ट्रपती पदाच्या कालावधीत त्यांनी अनेक देशांना सदिच्छा भेटी दिल्या. त्यांनी भारताला जागतिक महासत्ता होण्यासाठी विद्यार्थी आणि तरुणांना शिक्षणातून पुढे येण्याचे आवाहन केले. राष्ट्रपती पदाचा कालावधी संपल्यानंतर (२००७) त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले.

डॉ. कलाम यांचे लेखन मोजकेच आहे, पण त्यांतून त्यांची वैज्ञानिक दृष्टी दिसते. त्यांचे “विंग्ज ऑफ फायर” (१९९९-आत्मचरित्र); “इटर्नल क्वेस्ट” (बालसाहित्य, कादंबरी), “इग्नायटेड माइंड्ज अनलिशिंग द पावर विदिन इंडिया” (२००१) हे ग्रंथ प्रसिद्ध असून तमिळ भाषेत “येनु ड्या प्रयाण” हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे.

डॉ. कलाम यांनी केलेल्या वैज्ञानिक संशोधनाबद्दल त्यांना “पद्मभूषण”, “पद्मविभूषण” आणि भारतातील सर्वोच्च “भारतरत्न” या पुरस्कारांनी गौरवण्यात आले. डॉ. कलाम यांचा देशवासियांना विशेषतः भारतीय शास्त्रज्ञांना असा संदेश आहे की, "तुमची राष्ट्रीय दृष्टी ही राष्ट्रीय मिशनमध्ये परिवर्तीत झाली पाहिजे. तुम्हीच सर्व गोष्टी करा, बाहेरचे तंत्रज्ञान उसने घेऊन नजीकचा मार्ग शोधू नका." तसेच तरुणांना ते म्हणतात, "स्वप्न, स्वप्न, स्वप्न”.

" शिलॉंग (मेघालय) येथे दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी त्यांचे निधन झाले.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ)